संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# समाजाचा मनोभंग करणाऱ्या घटना

एकेकाळी घराघरामध्ये संस्कार टिकवून ठेवण्यासाठी स्पर्धा लागत असे. आपले घराणे इतरांपेक्षा कसे संस्कारी आहे, हे दाखविण्यात अभिमान बाळगला जात होता. एकत्र कुटुंब पद्धती असल्यामुळे एकमेकांचे हित आपोआप जपले जात होते. समाजात कसे वावरावे, व्यवहार कसे करावे, मोठ्यांविषयी आदर कसा बाळगावा किंवा एकूणच आपल्याला मिळालेले आयुष्य अधिकाधिक चांगल्या पद्धतीने कसे जगता येईल याची शिकवण घरातूनच दिली जात असे. पहाटे लवकर उठण्यापासून ते वेळच्यावेळी अभ्यास करण्यापर्यंत घरातल्या कामांमध्ये मदत करण्यापासून ते संध्याकाळच्या वेळी एकत्र बसून प्रार्थना म्हणण्यापर्यंत अनेक गोष्टी सहजपणे घडून येत असत. हे वातावरण प्रामुख्याने महाराष्ट्रात किंवा मराठी कुटुंबामध्ये अगदी गेल्या ३० वर्षांपर्यंत हमखासपणे दिसून येत असे. देशातल्या अन्य राज्यामध्ये अगदी असेच वातावरण नसले तरी एकत्र कुटुंबामध्ये एकमेकांचा आदर बाळगणे, एकमेकांच्या मुलांकडे लक्ष देणे. शाळांव्यतिरिक्त मुलांना आणखीन चांगले काय शिक्षण देता येईल याचा विचार केला जात असे. थोडक्यात सांगायचे तर ३० ते ४० वर्षांपूर्वी घर किंवा कुटुंब हेच जीवनाला खरे आकार देणारे संस्कार केंद्र होते. तर शिक्षण संस्कार किंवा शाळा त्या त्या विद्यार्थ्यांना किंवा मुलांना जीवन व्यवहार शिकवीत असत. आणि मुलाचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी त्यांच्या उद्योगव्यवसायासाठी आवश्यक तेवढे शिक्षण देत असत. आज बरोबर याच्या उलट परिस्थिती पहायला मिळत आहे. उलट म्हणण्यापेक्षाही विपरित परिस्थिती निर्माण झालेली आहे. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणून, मुंबईजवळच्या नालासोपारा येथे घडलेली ताजी घटना तिथे एका बारा वर्षाच्या मुलाला त्याच्याच शाळेतील मुलांनी मारण्याचा प्रकार घडला. हा प्रकार चित्रपट पाहून केल्याची कबुली जेव्हा या मुलांनी दिली त्यावेळेला समाजाबरोबर घराघरातले वातावरण हे कसे विकृतीने आवळले जात आहे. याचे प्रत्यंतर येते. अविश्वास पैसा कमावण्याचा हव्यास, एकमेकांविषयीचा दुस्वास यामुळे घराघरातले वातावरण गढूळ होत चालले आहे. त्यामध्ये सुधारणा कशी करायची असा फार मोठा प्रश्न किंवा अव्हान निर्माण झाले आहे. जर या पद्धतीने चित्रपट, टी व्ही. मालिका, इंटरनेट, फेसबुक, व्हाटसअप या गोष्टी समाजाचे प्रबोधन करण्याऐवजी अध:पतन करत असतील तर ती सर्वात मोठी भयघंटा समजायला हवी.

**चित्रपट टी व्हीचा विकृत पगडा**

अलिकडे देशभरात अनेक ठिकाणी कुटुंबांमध्ये, शाळा, कॉलेजेसमध्ये हे प्रकार सर्रासपणे घडतांना दिसतात. ते का वाढत आहेत याची कल्पना येऊनही ते थांबवण्यासाठी कोणीही पुढाकार घेताना दिसत नाही. जे कोणी समाजातला चांगुलपणा टिकविण्याचा प्रयत्न करीत असतात त्यांना कमी लेखले जाते. परंतु अतिशय गंभीरपणे विचार केला तर या सगळ्या सामाजिक घसरणीचे मूळ कुटुंब व्यवस्थेत घडले आहे. त्याचाच गैरफायदा घेऊन चित्रपट निर्माते हिंसाचाराने माखलेले चित्रपट दाखवत असतात. जसे पूर्वीच्याकाळी घर हे संस्कारांचा बालेकिल्ला होता. त्यामुळे भगदाड पाडण्याची हिंमत किंवा दुष्कर्म कोणीही करू शकत नव्हते. केवळ वर्षातून एक-दोन वेळा फक्त मनोरंजनासाठी चित्रपट पाहायला जात असे. आता मनोरंजनाऐवजी चित्रपट टीव्हीमधून समाजाचा मनोभंग आणि तेजोभंग केला जात आहे. घराघरातले संस्कार हद्दपार होत आहेत. घराची जागा एखाद्या चित्रपटगृहाने घेतली आहे की काय असे वाटू लागते. मोठ्या आकाराचे पडदे असलेले टीव्ही घराघरात लटकलेले आहे. पूर्वी संध्याकाळच्या वेळी एकत्र बसून प्रार्थना म्हटली जात असे. आता टीव्ही समोर घरातले सगळे लोक एकत्र बसून त्यातला हिंसाचार पहात असतात. घराचेच थिएटर झाले आहे वाटेल तसा व्याभिचार हिंसाचार मोठ्यासमोरच लहान मुलेदेखील बघत असतात. त्यातून चित्रपटातल्या या सगळ्या प्रकाराला मोठ्याची देखिल मान्यता आहे. असा लहानांचा समज होतो आणि मग मोठ्यांचा धाक वगैरे बाजूला राहिला. त्या मोठ्यांनाच धमकावण्याचे किंवा त्यांच्या गैरहजेरीत वाटेल तो धिगांणा घालण्याचा परवाना त्यांना मिळतो. कुठेतरी या कोवळ्या मनांवर नको त्या वयात विकृत वळणाचा पगडा बसतो. घरातल्या वातावरणापेक्षा चित्रपट टी व्हीतले वातावरण त्यांना जास्त आर्कषक आणि विश्वासाचे वाटते. त्यातूनच मग या लहान मुलांकडून एकमेकाचा जीव घेण्याच्या घटनाही घडतात.

**चांगल्या समाजव्यवस्थेला धक्के**

नालासोपाऱ्यातली घटना हा काही पहिलाच प्रकार नव्हे. यापूर्वी वर्गमित्रांकडूनच एकमेकांचे जीव घेण्याच्या घटना घडल्या आहेत. एवढेच नव्हे तर गुरुस्थानी असलेल्या शिक्षकांनादेखील मारहाण करण्याचे प्रकार घडले आहेत. आई वडिलांना फसवण्यात हे तर अलिकडच्या मुलांना चित्रपटाप्रमाणे बाये हाथका खेल वाटू लागला आहे. मोबाईल नको त्या वयात वापरायला दिला जातो आणि खोटे बोलायचा आपोआप परवानाही मिळतो. या सगळ्या गोष्टी जर लक्षात घेतल्या तर या विज्ञान तंत्रज्ञान युगातील आजची पिढी किती वेगाने घसरणीला लागली आहे याचा अंदाज येतो. नालासोपाऱ्याच्या प्रकरणात त्या विद्यार्थ्यांनी कबुली दिल्यामुळे चित्रपटाचा या लहान मुलांच्या मनावर कसा गंभीर परिणाम होतो आहे तो सिद्ध होते. याचा अर्थ या मुलांना घरातले वातावरण सांभाळू शकत नाही शाळेतली परिस्थिती पाहिजे तसा परिणाम घडवू शकत नाही. असेही म्हणणे भाग पडते हे सगळ्याच घरांबाबत किंवा विद्यार्थ्यांबाबत घडते असे आमचे म्हणणे नाही. परंतु समाजातील एक मोठा वर्ग प्रसार माध्यमांच्या खरेतर चित्रपट टीव्ही इंटरनेटच्या विकृत विळख्यांमध्ये अडकत असल्याचे दिसून येते. आज आपल्या समाज व्यवस्थेत सत्तर टक्के मध्यमवर्गीय लोक आहेत. त्यांना आपल्या दैनंदिन गरजादेखील पूर्ण करता येत नाहीत. चित्रपटातला श्रीमंतीचा थाट किंवा खोटा भपका या मुलांना किंवा मोठ्यांनासुद्धा आकर्षित करतो आणि आपलेही आयुष्य असेच ऐशारामी असावे, असे त्यांना वाटत असते. झटपट पैसा मिळवण्याचा मोह चित्रपटातून निर्माण होतो. यामुळे समाजात अनावश्यक गोष्टींना महत्त्व मिळते आणि चांगल्या समाज व्यवस्थेसाठी मदत होण्याऐवजी त्याला धक्के बसत आहेत.